# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २८/०४/२०२२ (गुरूवार)**

**(सायंकाळ)**

---

## विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. केळवद** :— दिनांक १९/०९/२०१९ चे २१.०७ वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. केळवद येथे अप. क्र. २१६/२०१९ कलम ३५४, ३५४ (अ), ४५२ भादवी सहकलम ८, १२ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक १९/०९/२०१९ चे ०१.३० वा. दरम्यान १५ वर्षीय पिडीत/फिर्यादी अल्पवयीन मुलगी ही घरात दाराला कडी लावून झोपली असतांना आरोपी नामे— सत्यप्रकाश भिमराव नारनवरे, वय ३९ वर्ष, रा. ढालगाव याने फिर्यादीच्या घरात जाउन तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. आरोपीला दिनांक १९/०९/२०१९ चे २२.५७ वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक श्री. सुरेश मट्टामी, पो.स्टे. केळवद यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक २८/०४/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. ओ. पी. जयस्वाल, जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ४५२ भादंवि. मध्ये ६ महीने सश्रम कारावास व ५००/—रु. दंड व दंड न भरल्यास १ महिना सश्रम कारावास, कलम ३५४ भादंवि. मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व ५००/—रु. दंड व दंड न भरल्यास १ महिना शिक्षा, कलम ८ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व १०००/—रु. दंड व दंड न भरल्यास १ महिना सश्रम कारावास तसेच १२ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व ५००/—रु. दंड अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. खापर्डे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि श्रीमती शुभांगी वाझे तर कर्मचारी सहा.फौज. श्री. शंकरराव तराळे, श्री. सुनिल डोंगरे, पोहवा श्री. मनोज तिवारी व श्री रविन्द्र डोरले यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**